# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 258 /2020** **दिनांक: 28 / 04/2020**

वाचा —
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 242 /2020 दिनांक 14.04.2020
7. फौजदारी प्रक्रिया संहिता — 1973
8. मुंबई पोलीस अधिनियम 1951

**दुकानदार/विक्रते/सर्व जिवनावश्यक वस्तु विक्रेते/ इ. यांनी सोशल डिस्टंसिंगचे नियम न पाळता विक्री करीत असल्यास कारवाई.**

## आदेश

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार *दिनांक* 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-१९) *उद्भ्वलेल्या* संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020 चे आदेशाद्वारे संचारबंदी बाबत अतिरिक्त मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, मी **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार व प्रदान करण्यात आलेल्या अधिकरानुसार अकोला जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने विविध आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदीनुसार संचारबंदी बाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 मधील कलम 3 अन्वये — Penalty Any person disobeying any regulation or ordere made under this Act shall be deemed to have committed an offence punishable under section 188 of the Indian Penal Code ( 45 of 1860 ) अशी तरतुद नमूद केली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, फौजदारी प्रक्रिया संहिता — 1973, मुंबई पोलीस अधिनियम 1951 तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेले आदेशांचा भंग , काही व्यक्ती करित असल्याचे माझे निदर्शनास आले आहे. अत्यावश्यक सेवेकरिता जी दुकाने/प्रतिष्ठाने सुरु ठेवण्यात आलेली आहेत. त्या संबंधीत ठिकाणी सामाजिक अंतर (Social Distance) या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. परंतू त्या ठिकाणी या नियमाचे पालन न झाल्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ज्या आस्थापनांना संचारबंदी कालावधीत सुरु

ठेवण्याबाबत सुट देण्यात आलेली आहे त्या ठिकाणी सामाजिक अंतर (Social Distance) या नियमाचे पालन करण्यासाठी त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करणे गरजेचे असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 ची अधिसूचना व फौजदारी प्रक्रिया संहिता -1973 चे कलम 144 व मुंबई पोलीस अधिनियम -1951 , कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश निर्गमित करित आहे.

1. **जिवनावश्यक वस्तुचे विक्रेते /दुकानदार यांनी ग्राहकांमध्ये सामाजिक अंतर ( Social Distancing) नियम पाळणे अनिवार्य आहे.**
2. **सामाजिक अंतर ( Social Distancing) नियम न पाळणा-या आस्थापना, मालक, दुकानदार, विक्रेता यांना प्रथम रु. 1000/- एवढी शास्ती आकारण्यात येईल.**
3. **तसेच दोनवेळेस दंडनिय कारवाई झाल्यानंतर सुध्दा उपरोक्त नियमाचे पालन करतांना न आढळल्यास संबंधीत दुकानाचा / प्रतिष्ठानाचा परवाना तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येईल.**
4. **दुकानातील मालाची हाताळणी करणारे विक्रेते व दुकानातील कर्मचारी यांनी मास्क ,हॅन्डग्लोज चा वापर करणे अनिवार्य आहे.**
5. **दुकानदारांनी आपल्या प्रतिष्ठानासमोर ग्राहकांकरिता हात धुण्याकरिता सॅनिटायझर किंवा प्रतिबंधात्मक साहीत्य ठेवणे अनिवार्य आहे.**
6. **एका वेळेस जास्तीत जास्त 5 व्यक्ती दुकानासमोर राहतील तसेच त्यांचेमध्ये सामाजिक अंतर ( Social Distancing) ठेवणे अनिवार्य आहे.**
7. **ग्राहकांमध्ये व काऊंटरमध्ये 3 फुट पेक्षा जास्त अंतर ठेवण्यात यावे.**
8. **या कार्यालयाकडून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची सुध्दा दक्षता घेण्यात यावी.**

उपरोक्त आदेशांचा भंग करणा-या व्यक्ती विरुध्द भारतीय दंड सहिता — 1860 चे कलम 188 नुसार पारीत केलेल्या आदेशाचे दिनांकापासून गुन्हे दाखल करणेकामी अकोला जिल्हातील संबंधीत पोलीस अधिकारी /कर्मचारी तसेच संबंधीत कार्यालय प्रमुख यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

सदर आदेश आज दिनांक 28 एप्रिल 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
5. सहा. आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता. . त्यांनी सदर आदेशाचे तंतोतत पालन होण्याचे दृष्टीने आपले अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना परस्पर कळविण्याकरिता.
6. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. तहसिलदार -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला